कर आकारणी कर संकलन कार्यालय,
पुणे महानगरपालिका

# जाहिर प्रकटन

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ नियम ७ नुसार दरमहा प्रती चौरस फुटास वाजवी भाड्याचा दर एकूण ५३ विभागांत ६०० भागांमध्ये निवासी (आर.सी.सी.,लोड बेरिंग, साधे पत्राशेड), बिगर निवासी (आर.सी.सी.,लोड बेरिंग, साधे पत्राशेड), पार्किंग (निवासी/ बिगर निवासी) या मिळकतींच्या प्रकारात ठरविण्यात आलेल्या व दि. ३१/०३/२०२६ अखेर सध्या अस्तित्वात असलेल्या वाजवी भाड्याच्या दरामध्ये दि. ०१/०४/२०२६ पासून मा. महापालिका आयुक्त यांनी ठराव क्र. ६/९०१ दि. १०/०३/२०२६ अन्वये दि. ०१/०४/२०२६ पासून नव्याने कर आकारणीसाठी येणा-या मिळकतींचे प्रती चौ.फुटास वाजवी भाड्याच्या दरामध्ये खालीलप्रमाणे वाढ करणेस प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

दर महा प्रती चौ.फुटास वाजवी भाड्याच्या दर एकूण ५३ विभागांत ६०० भागांमध्ये निवासी (आर.सी.सी.,लोड बेरिंग, साधे पत्राशेड), बिगर निवासी (आर.सी.सी.,लोड बेरिंग, साधे पत्राशेड), कार्यालय, मोकळया जागा (व्यापारी तत्वावर वापर), केवळ मोकळया जागा, पार्किंग (निवासी/ बिगर निवासी) याकरिता सर्व विभागात निश्चित करण्यात आलेल्या दि. ०१/०४/२०२५ ते दि. ३१/०३/२०२६ च्या वाजवी भाड्याच्या दरामध्ये दि. ०१/०४/२०२६ पासून सरसकट ५% वाढ करून त्याप्रमाणे सुधारित दर असणार आहेत.

तरी दि. ०१/०४/२०२६ पासून नव्याने कर आकारणीसाठी येणा-या सर्व मिळकतींस सुधारित दराने कर आकारणी करणेत येणार आहे. याबाबतची माहिती नागरिकांना होण्यासाठी सदर माहिती प्रसिद्धीस दिली आहे. कृपया सर्व मिळकतदरांनी याची नोंद घेऊन कर आकारणी न झालेल्या, वाढीव बांधकाम केलेल्या, मोकळया जागा असलेल्या, वापरात बदल केलेल्या मिळकतींची कर आकारणी करून घ्यावी ही विनंती आहे.

10.3.26

(रवि पवार)
उप आयुक्त तथा
कर आकारणी व कर संकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका